# पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीची सुचना

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर

मे. अंबुजा सिमेंट लि. पो. उप्परवाही, ता. कोरपना, जि. चंद्रपूर यांच्या प्रस्तावित इंटीग्रेटेड सिमेंट प्रोजेक्ट क्लिंकर (2.85 दशलक्ष टन/वर्ष ते 6.15 दशलक्ष टन/वर्ष), सिमेंट (4.75 दशलक्ष टन/वर्ष ते 10.0 दशलक्ष टन/वर्ष) व डब्ल्युएचआर (45 मेगावॅट) उत्पादन क्षमतेच्या प्रकल्पाच्या विस्तारीकरणाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणी घेण्याकरिता मंडळाकडे अर्ज सादर केला आहे. सदर प्रकल्पामुळे कोरपना तालुक्यातील उप्परवाही, कुकडसाट व थुटरा तसेच राजूरा तालुक्यातील भेंडवी, मंगी, सोनापूर, इसापूर व हरदोणा ही गावे प्रभावित होणार आहेत. सदरील प्रस्तावित प्रकल्पाकरिता भारत सरकारच्या पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्लीचे 14 सप्टेंबर, 2006 च्या अधिनियमान्वये व 01 डिसेंबर, 2009 च्या सुधारित अधिनियमान्वये उपरोक्त प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यात येत आहे.

सदर जनसुनावणी पर्यावरण विषयक बाबींबाबत घेण्यात येत असून सदर नियोजित प्रकल्पाच्या परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयक काम करणाऱ्या संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पासंबंधी टिका-टिप्पणी किंवा आक्षेप तोंडी किंवा लेखी स्वरुपात नोंदविता येईल.

सदर प्रकल्पासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका-टिप्पणी तसेच आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून 30 दिवसांच्या आत खालील पत्यावर नोंदविण्यात याव्यात.

**प्रादेशिक कार्यालय व उप-प्रादेशिक कार्यालय**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ**
**उद्योग भवन, पहिला माळा, बस स्टॅण्ड समोर, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर**
**फोन नं.: 07172-251965**
**ईमेल:- rochandrapur@mpcb.gov.in / srochandrapur@mpcb.gov.in**

सदर जाहीर जनसुनावणी कंपनीच्या परिसरात तसेच ऑनलाईन पध्दतीने वे-बॅक्स ॲप द्वारे घेण्यात येईल. मौखिक किंवा लेखी आक्षेप जाहिर जनसुनावणीच्या वेळेस सुध्दा नोंदविता येईल. जाहिर जनसुनावणी खालील ठिकाणी घेण्यात येईल:-

| | |
|---|---|
| **दिनांक** | :- 04/05/2023 |
| **वेळ** | :- दुपारी 12.00 वाजता |
| **स्थळ** | :- प्रकल्प स्थळ, मे. अंबुजा सिमेंट लि., मराठा सिमेंट वर्क्स, भेंडवी, ता. राजूरा, जि. चंद्रपूर. |
| **वे-बॅक्स ॲप मिटींग नंबर** | :- 2511 777 2376 |
| **पासवर्ड** | :- 04052023 |
| **Webex Meeting link** | :- https://mpcb.webex.com/mpcb/j.php?MTID=m32f5ebd39757c0f6a63b01197490cff7 |

सदर प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक माहिती असलेले दस्तावेज खालील कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. संबंधित व्यक्ती या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेमध्ये सदर दस्तावेज अभ्यासु शकतील.

1. पर्यावरण विभाग, 15 वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - 400 032.
2. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, 2 रा व 4 था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - 400 022.
3. प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
4. उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
5. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर.
6. जिल्हा परिषद, चंद्रपूर.
7. जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.
8. उप-विभागीय कार्यालय, राजूरा, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
9. उप-विभागीय कार्यालय, कोरपना, ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
10. तहसिल कार्यालय, कोरपना, ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
11. तहसिल कार्यालय, राजुरा, ता. राजुरा, जि. चंद्रपूर.
12. नगर परिषद कार्यालय, गडचांदूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
13. पंचायत समिती कार्यालय, कोरपना, ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
14. पंचायत समिती कार्यालय, राजुरा, ता. राजुरा, जि. चंद्रपूर.
15. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, कार्यकारी सारांश इंग्रजी व मराठीच्या प्रती प्रकल्पाच्या परिसरातील जवळच्या ग्रामपंचायत कार्यालय जसे की उप्परवाही, कुकडसाट व थुटरा, ता. कोरपना, जि. चंद्रपूर व ग्रामपंचायत कार्यालय भेंडवी, मंगी, सोनापूर, इसापूर व हरदोणा येथे नागरीकांना अभ्यासण्याकरिता ठेवण्यात आलेल्या आहेत.

स्वा/-
उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर
तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी